# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः10.08.2024** **वारःशनिवार**

---

1. रेल्वेच्या 24 हजार कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना मंजुरी, महाराष्ट्रातील जालना-जळगाव- 174 किलोमीटर लांबीच्या प्रकल्पाचा समावेश
2. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी भागासाठीच्या दुसऱ्या योजनेला आणि स्वच्छ वनस्पती योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता
3. नीट पीजी परीक्षा पुढं ढकलण्यास सर्वोच्च न्यायालयाचा नकार
4. बांग्लादेशातील संकटाच्या पार्श्वभूमीवर, भारतात घुसखोरी रोखण्यासाठी नागालँड मध्ये सतर्कतेचा इशारा आणि
5. पॅरिस ऑलिंपिकमध्ये अमन सेहरावतला कुस्तीत कास्य पदक, भारताला कुस्तीत पदक मिळवून देणारा सहावा कुस्तीपटू

**<u>रेल्वे-प्रकल्प</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहार-विषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीनं रेल्वे मंत्रालयाच्या 24,657 कोटी रुपयांच्या आठ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीनंतर नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांना ही माहिती दिली. या प्रकल्पांमध्ये ओडिशा, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, झारखंड, बिहार, तेलंगणा आणि पश्चिम बंगाल या सात राज्यांमधील 14 जिल्ह्यांचा समावेश असून या प्रकल्पांच्या माध्यमातून महत्त्वाकांक्षी जिल्हे आणि आदिवासी भागात विकासाला चालना मिळेल, असं वैष्णव यांनी सांगितलं.

**<u>केंद्रीय मंत्रिमंडळ</u>**

केंद्रीय मंत्रिमंडळानं प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत शहरी भागासाठीच्या दुसऱ्या योजनेला तसंच ग्रामीण भागात 2024-25 ते 2028-29 या आर्थिक वर्षातील अंमलबजावणीलाही मान्यता दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल नवी दिल्लीत माध्यमांना ही दिली. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तीन कोटी नवी घरं बांधण्यात येणार असून, त्यापैकी दोन कोटी घरं ग्रामीण भागात बांधली जातील, तर एक कोटी घरं शहरी भागात बांधली जातील. या योजनेसाठी तीन लाख साठ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार आहे, असंही त्यांनी सांगितलं. कृषी मंत्रालयाच्या स्वच्छ वनस्पती योजनेलाही सरकारनं मंजुरी दिली असून, यासाठी एक हजार 765 कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करण्यात येणार आहे. ही योजना देशातील फलोत्पादन क्षेत्रात क्रांती घडवून आणेल आणि उत्कृष्टता आणि टिकाऊपणासाठी नवी मानके स्थापित करेल अशी अपेक्षा आहे. या योजनेद्वारे विषाणूमुक्त, उच्च दर्जाचं लागवड साहित्य उपलब्ध करून दिलं जाईल, असंही वैष्णव यांनी नमूद केलं.

**<u>राष्ट्रपती-दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज पूर्व तिमोरला भेट देणार असून, त्या राजधानी दिली इथं तिमोरचे राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. न्यूझीलंडच्या दोन दिवसांच्या यशस्वी दौऱ्यानंतर त्या तिमोर-लेस्टेच्या दौऱ्यावर आहेत. तत्पूर्वी, काल त्यांनी न्यूझीलंडमधील ऑकलंड इथं भारतीय समुदायाशी संवाद साधला. भारत जगातील उत्कृष्ट लोकशाहीचे उदाहरण बनला असून, लवकरच तिसरी सर्वांत मोठी अर्थव्यवस्था बनणार आहे, असं त्यांनी सांगितलं. परदेशातही भारतीय सण, परंपरा आणि चालीरीती जपल्याबद्दल त्यांनी भारतीय समुदायाचं कौतुक केलं.

**<u>नीट-नकार</u>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी उद्या घेण्यात येणारी नीट पीजी परीक्षा पुढं ढकलण्याची मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. या परीक्षेसाठीची शहरांची ठिकाणं अनेक विद्यार्थ्यांसाठी गैरसोयीची असल्यानं परीक्षा पुढं ढकलावी, अशी मागणी या याचिकेत करण्यात आली होती. मात्र, दोन लाख विद्यार्थ्यांचं भविष्य धोक्यात आणणं अन्यायकारक असून, तत्त्वानुसार, न्यायालय परीक्षेचे वेळापत्रक बदलून लाखो उमेदवारांचं भविष्य धोक्यात आणू शकत नाही, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पीठानं स्पष्ट केलं. देशभरातील 500 परीक्षा केंद्रांवर उद्या ही परीक्षा होणार आहे. या परीक्षेसाठी 31 जुलै रोजी शहरे निश्चित करण्यात आली असताना, आठ ऑगस्टला पुन्हा काही विशिष्ट परीक्षा केंद्रांची घोषणा करण्यात आली, असंही या याचिकेत म्हटलं होतं.

**<u>संसद संस्थगित</u>**

संसदेच्या दोन्ही सदनांचं कामकाज काल निर्धारित वेळेच्या दोन दिवस आधी संस्थगित करण्यात आलं. गेल्या महिन्यात 22 तारखेला सुरु झालेलं संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचं कामकाज येत्या सोमवारपर्यंत निश्चित करण्यात आलं होतं. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी या सत्रात 15 बैठकी झाल्या आणि 115 तास काम झाल्याचं सांगितलं. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी 23 जुलै रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर केला. त्यावर सदनात 27 तास 19 मिनिटं चर्चा झाली. या काळात 12 विधेयकं मांडण्यात आली, त्यापैकी लोकसभेत आर्थिक विधेयक, आर्थिक विनियोजन विधेयक, जम्मू काश्मीर विधेयक आणि भारतीय वायूयान विधेयक अशी चार विधेयकं मंजूर झाली, तसंच लोकसभेत 136 टक्के कामकाज झाल्याचंही बिर्ला यांनी सांगितलं.

**<u>नागालँड-हाय अलर्ट</u>**

शेजारील बांगलादेशात सुरू असलेल्या राजकीय संकटाच्या पार्श्वभूमीवर नागालँड राज्यातील अवैध स्थलांतरितांची घुसखोरी रोखण्यासाठी नागालँड सरकार दक्ष झालं आहे. राज्यभरातील उपायुक्तांना आपापल्या जिल्ह्यातील सर्व सुरक्षा समन्वय सक्रिय करण्याच्या सूचना देण्यात आल्याचं गृह आयुक्त व्यासन आर यांनी काल सांगितलं. अचानक तपासणीसह विशेष आयएलपी तपासण्या तीव्र करण्याच्या सूचना उपायुक्तांना दिल्या असल्याचं ते म्हणाले. याशिवाय राज्यात एक अतिशय मजबूत ग्राम परिषद स्थापन करण्यात आली आहे. ग्रामपरिषदांना सक्रिय करण्याचा सल्ला उपायुक्तांना देण्यात आला असून कोणत्याही असामान्य हालचाली किंवा घटनेची त्वरित तक्रार करण्यासाठी संपर्क माध्यमं खुली असल्याची खात्री करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्वरित इशारा देणारी यंत्रणा सक्षम करण्यासाठी आसामच्या समकक्षांशी बैठका सुरू केल्याचं व्यासन म्हणाले.

**<u>जागतिक सिंह दिन</u>**

जंगलचा राजा सिंहाच्या संवर्धनाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने आज जागतिक सिंह दिवस साजरा केला जात आहे. सिंहांची घटती संख्या आणि त्यांचं विविध धोक्यांपासून संरक्षण करण्याची तातडीची गरज-याकडे जगाचं लक्ष वेधणे; हा या दिवसाचा उद्देश आहे. भारतात सिंहांच्या संवर्धनाला सांस्कृतिक आणि पर्यावरणीय महत्त्व आहे. केवळ गीरच्या जंगलात आढळणाऱ्या आशियाई सिंहाचं भारत माहेरघर आहे. या प्रदेशातील संवर्धनाच्या प्रयत्नांमुळे 2015 मधल्या सिंहांची संख्या 523 वरून 2020 वर्षामध्ये 674 पर्यंत वाढली असल्याचं पर्यावरण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे. 15 ऑगस्ट 2020 रोजी घोषित केलेला 'सिंह प्रकल्प' हा सर्वसमावेशक, दीर्घकालीन संवर्धनाच्या प्रयत्नांद्वारे आशियाई सिंहांचं भविष्य सुरक्षित करण्याच्या उद्देशाने एक महत्वाचा उपक्रम आहे. हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प एक शाश्वत वातावरण तयार करण्यावर केंद्रित असून यामुळे सिंहांच्या संख्येत वाढ होईल. या उपक्रमाच्या प्रमुख घटकांमध्ये सिंहांचा अधिवास सुधारणे, रेडिओ-कॉलरिंग आणि कॅमेरा ट्रॅप यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानाद्वारे त्यांच्यावर देखरेख ठेवणे आणि मानव-वन्यजीव संघर्ष सोडवणे यांचा समावेश आहे.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर आणि मालदीवचे परराष्ट्र व्यवहार मंत्री, मूसा जमीर यांनी काल मालेमध्ये समुदाय विकास प्रकल्पांचं उद्घाटन करत सामंजस्य करारांची देवाणघेवाण केली. माले इथे परराष्ट्र मंत्री मूसा जमीर यांच्याशी

झालेली चर्चा फलदायी झाल्याचं जयशंकर यांनी एक्स या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. या चर्चेत विकास भागीदारी, क्षमता निर्माण, द्विपक्षीय आणि प्रादेशिक सुरक्षा, व्यापार आणि डिजिटल सहकार्य या विषयांचा समावेश होता. जयशंकर नऊ ते 11 ऑगस्ट दरम्यान मालदीवच्या दौऱ्यावर गेले आहेत.

**पॅरिस ऑलिम्पिक- अमन सेहरावत**

भारतीय कुस्तीपटू अमन सेहरावतनं काल पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कुस्तीत भारताला पहिलं पदक मिळवून दिलं. सेहरावतनं पुरूषांच्या फ्रीस्टाइल 57 किलो वजनी गटात पोर्टो रिकोच्या डॅरियन टोई क्रुझचा 13-5 असा पराभव करून भारताचं सहावं पदक निश्चित केलं. 1952 मध्ये हेलसिंकी ऑलिम्पिकमध्ये पदक जिंकणारे कुस्तीपटू खाशाबा जाधव, तसच सुशील कुमार, योगेश्वर दत्त, रवी दहिया आणि बजरंग पुनिया यांच्यानंतर ऑलिम्पिक पदक जिंकणारा तो देशातील सहावा पुरुष कुस्तीपटू ठरला आहे. 21 वर्षे आणि 24 दिवस वय असणाऱ्या अमन सेहरावतनं भारताचा सर्वांत तरुण पदक विजेता क्रिडापटू बनण्याचा पीव्ही सिंधूचा विक्रमही मोडला आहे. भालाफेकपटू नीरज चोप्राने जिंकलेल्या पदकासह भारतानं पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आतापर्यंत पाच कास्य पदके आणि एक रौप्यपदक मिळवलं आहे. या स्पर्धेत उरलेली भारताची शेवटची स्पर्धक रीतीका हुड्डा महिलांच्या फ्रीस्टाइल 76 किलो वजनी गटात खेळणार असून, तिच्याकडून भारताच्या पदक तालिकेत भर पडण्याची अपेक्षा आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार